# CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM

MAHARASHTRA STATE ELECTRICITY DISTRIBUTION COMPANY LTD.

Old Power House Premises, Dr. Ambedkar Road, Aurangabad. Phone: 0240 - 2336172

No:- CGRF / AZ / AUR / R/ 547 / 2015 / 10 Date :-

To,
01) The Executive Engineer ( Administration)
Nodal Office, O/O Superintending Engineer ,
O&M Rural Circle, M.S.E.D.C.L.,
Aurangabad.

*Sub:*- Forwarding of grievance in respect of M/s. Sant Dnyaneshwar Industries Gut No. 129, Bhendala Tq. Gangapur, Dist. Aurangabad 431 201 ( M.S. ) India. ( Consumer No. 504870007757 )

Dear Sir,

Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum, in respect of M/s. Sant Dnyaneshwar Industries Gut No. 129, Bhendala Tq. Gangapur, Dist. Aurangabad 431 201 .

You are requested to Redress the grievance or submit your Para wise reply at the time of hearing. The hearing in the matter will be held on 03 02.2015 at 12.00 Hours.

Member/Secretary
CGRF(AZ) MSEDCL
Aurangabad

Encl: As above

Copy to:-

M/s. Sant Dnyaneshwar Industries
Gut No. 129, Bhendala Tq. Gangapur,
Dist. Aurangabad 431 201 ( M.S. )

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**प्रकरण क्र.सीजीआरएफ / एझेड / औबाद / ग्रामिण / ५४७ / २०१५ / १०**

**तक्रार दाखल दिनांक :- २१.०१.२०१५.**
**निकाल दिनांक :- १०.०३.२०१५.**

**मे. संत ज्ञानेश्वर इंडस्ट्रीज,** **तक्रारदार**
**गट नंबर १२९, भेंडाळा,**
**जिल्हा औरंगाबाद.**
**( ग्राहक क्रमांक ५०८४७०००७७५७ )**

**विरुध्द**

**कार्यकारी अभियंता ( प्रशासन ),** **गैरअर्जदार**
**ग्रामिण विभाग,नोडल ऑफिस,**
**म.रा.वि.वि.कं.म. औरंगाबाद**

मंच सदस्य

| | |
|---|---|
| डॉ. भास्कर गो.पालवे, | अध्यक्ष |
| श्री. नामदेव आर गांधले, | सदस्य / सचिव |
| श्री. विलासचंद्र सु. काबरा, | सदस्य |

**ग्राहक गा-हाणे निवारण मंचाचा निर्णय -**

अर्जदार मे.संत ज्ञानेश्वर इंडस्ट्रीज ता. गंगापुर जि.,औरंगाबाद यांनी दिनांक २१.०१.२०१५ रोजी महाराष्ट्र विदयुत नियामक आयोग ( ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विदयुत लोकपाल ) विनीयम २००६ च्या असूसुची अ या नमुन्यात गैरअर्जदार कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) ग्रामीण विभाग, जालना यांचे विरोधात तक्रार अर्ज दाखल केला

पान क्रमांक २/-

सदर अर्जासंबधी दिनांक ०३.०२.२०१५, १०.०२.२०१५, २४.०२.२०१५ आणि ०३.०३.२०१५ रोजी सुनावणी घेण्यात आली त्याचप्रमाणे दिनांक २४.०२.२०१५ रोजी मा. मंचाने प्रस्तावित उदयोगास भेट देऊन बांधलेल्या शेडची ,यंत्रसामुग्रीची व विदयुत पुरवठा लाईनची पाहणी केली असता तक्रार संबधिची थोडक्यात माहिती खालीलप्रमाणे आहे.

१ ) मे. संत ज्ञानेश वर इंडस्ट्रीज ता. गंगापुर जि. औरंगाबाद यांनी सादर केलेल्या तक्रार अर्जानुसार त्यांचा विज ग्राहक क्रमांक ५०४८७०००७७५७ असा आहे. श्री . शैलेश गणेश कुलकर्णी व श्री. वि.पु. कुलकर्णी यांनी मिळून मे. संत ज्ञानेश्वर इंडस्ट्रीज , भेंडाळा येथील स्वतच्या शेतात उभारण्याचे प्रस्तावित केले आहे. सदर उदयोग हा शेतीवर आधारीत आहे. कोळशाला पर्याय म्हणून शेतातील प-हाटी तुराटी व इतर जाळण्यायोग्य वस्तुपासुन ब्रिकेटस तयार करणार आहेत. सदर उदयोगासाठी जिल्हा उदयोग केन्द्राकडून नोंदणी घेतलेली आहे.सदर उदयोगापासून एकूण सुमारे २८ लोकांना रोजगार उपलब्ध होणार आहे.

२ ) या उदयोगाला आवश्यक विदयुत पुरवठा करण्यासाठी म.रा.वि.वि.कं.म.कडे सर्व आवश्यक कागदपत्रासह अर्ज केला. त्यानंतर महावितरण कंपनीच्या डिमांड नोट नुसार दिनांक २५.११.२०१५ रोजी रुपये ११३३००/- पावती क्रमांक ०३९१६ दिनांक २५.११.२०१२३ अन्वये जमा करण्यात आले. त्यानंतर डोबींवली नागरी सहकारी बॅक शाखा, औरंगाबाद यांचेकडून कर्ज मंजूर करण्यात आले. विदयुत पुरवठा निश्चीत झाल्यामुळे मशीनसाठी रुपये ४ लाख आगाऊ अदा करण्यात आले. आतापर्यन्त एकुण रु. २३ लाख खर्च करण्यात आला आहे.

३ ) उदयोगासाठी विदयुत पुरवठा वेळीच मिळावा म्हणून आवश्यक रक्कम अदा केल्यानंतर संबधीत अधिका-याकडे पाठपुरावा करण्यात आला. परंतु लवकर काम करु असे आश्वासन देण्यात येत होते.

जानेवारी २०१४ मध्ये अर्धवट काम करण्यात आले त्यानंतर स्थगित कामासाठी

पान क्रमांक ३ /-

पाठपुरावा केला असता , कंत्राटदाराची देयके प्रलंबित असल्यामुळे काम बंद आहे असे सांगण्यात आले. त्यानंतर सदर कामासाठी मुदत वाढीसाठी प्रस्ताव सादर केला असून मुदतवाढ मिळताच काम पूर्ण करु असे सांगण्यात आले शेवटी २४.११.२०१४ पासून सर्व अधिका-यांना लेखी विनंती केली परंतु कोणीही त्यास उत्तर दिले नाही किंवा काम पूर्ण करण्यासाठी कारवाई केली नाही.

दिनांक ३०.१०.२०१४ रोजी खासदार श्री चद्रकांतजी खैरे यांचे अध्यक्षतेखालील बैठकीत अर्ज केला व म्हणणे मांडले तेथे अधिक्षक अभियंता यांनी कंत्राटदाराने काम पूर्ण केले नसून त्यांचेवर कार्यवाही करु लवकर काम पूर्ण करु असे सांगितले .

शेवटी काहीच उपयोग झाला नाही त्यामुळे अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण मंचाकडे अर्ज केला. त्यांनी सदर काम इन्फ्रा २ योजनेअंतर्गत काम करु आणि तातडी असेल तर आपण १.१३ टक्के योजने अंतर्गत काम करावे असे सुचविले. तसेच सदर काम कंत्राटदाराने केले नसून प्रथमदर्शी आपणच केले आहे असे पत्र दिनांक २१.११.२०१४ रोजी ग्राहकास अधिक्षक अभियंता यांनी दिले आहे.

या सर्व पत्र व्यवहारावरुन सदर कामात महावितरण कंपनीच्या अधिका-यांनी केलेले दुर्लक्ष व बेजबाबदार पणा दिसुन येतो असे अर्जदाराचे म्हणणे आहे. त्यामुळे ग्राहकाचे रु. २५ लाख चे नुकासान झाले आहे व त्यास दरमहा रु. १.५० ची वाढ होत आहे. तसेच दरमहा रुपये २५ लाख उलाढाल होणार आहे त्याचे नुकसान होणार आहे. ग्राहकाने खालील मागणी केलेली आहे.

१ ) उदयोगासाठी त्वरीत विज पुरवठा मिळावा.

२ ) नुकसान भरपाई देण्यात यावी.

२ ) कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) ग्रामिण मंडळ, महावितरण,औरंगाबाद यांचे म्हणणे
कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) ग्रामिण मंडळ, महावितरण, यांनी त्यांचे दिनांक २४.०२.२०१५ पत्रानुसार आपले म्हणणे सादर केले आहे. त्यानुसार ग्राहकाचे उर्वरीत

पान क्रमांक ४ /-

कामे हे महावितरण कंपनीच्या इन्फ्रा - २ स्कीम मध्ये करण्यात येईल. जर ग्राहकास सदरील काम तातडीने करण्याचे आवश्यक असल्यास ग्राहकाने महावितरण कंपनीच्या Non DDF, CCRF स्कीममध्ये अंदाजपत्रक मंजूर करण्यासाठी ग्राहकाचे संमतीपत्रक सादर करावे. जेणेकरुन १.३ टक्के सुपरविजन चार्जेस भरुन ग्राहकास काम करता येईल व आपल्याला येणा-या विदयुत बिलातुन महावितरण कंपनीच्या नियम व मंजूरीप्रमाणे कामासाठी लागणा-या खर्चाची वजावट करुन दिली जाईल. यासंबधी ग्राहकास त्याचे पत्र क्रमांक ५५१५ दि. २९.११.२०१४ नुसार कळविण्यात आले आहे. सदर काम जेष्ठता यादीप्रमाणे करुन देण्यात येईल असे म्हटले आहे

**ग्राहक गा-हाणे निवारण मंचाचा निष्कर्ष** -

अर्जदार व गैरअर्जदार यांनी वेळोवेळी सुनावणी दरम्यान दाखल केलेल्या लेखी व तोंडी म्हणण्यानुसार ग्राहकास विदयुत पुरवठा देण्यात मोठया प्रमाणात दिरंगाई झाली आहे. त्यामुळे उदयोगाचे मोठया प्रमाणात नुकसान झालेले आहे, ग्राहकास महावितरण कंपनीकडून मानसिक व आर्थिक त्रास झालेला आहे. सदर बाबतीत महावितरण कंपनीची सेवा दोषपूर्ण आहे. वरील सर्व बाबीचा विचार करता मा. मंच खालील आदेश निर्गमित करीत आहे.

## आदेश

१ ) अर्जदारास उदयोग सुरु करण्यासाठी मागितलेला विदयुत पुरवठा त्वरीत करण्यात यावा सदर कालावधी तिन महिन्यापेक्षा जास्त असू नये.

२ ) ग्राहकाने आर्थिक भरपाईसाठी महावितरण कंपनीकडे अर्ज करावा.

३ ) केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल ३० दिवसात मंचास सादर करावा.

| | | |
|---|---|---|
| स्वाक्षरीत | स्वाक्षरीत | स्वाक्षरीत |
| डॉ.भास्कर गो.पालवे | विलासचंद्र. सु. काबरा | नामदेव रा.गांधले |
| अध्यक्ष | सदस्य | सदस्य/सचिव |

ग्राहक गा-हाणे निवारण मंच
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.
जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

क्र.सीजीआरएफ/एझेड /औबाद / ग्रामिण / ५४७ /२०१५ / १० / दिनांक :-

प्रति,
मे. संत ज्ञानेश्वर इंडस्ट्रीज,
गट नंबर १२९, भेंडाळा,
ता. गंगापुर जिल्हा औरंगाबाद.
ग्राहक क्रमांक ५०८४७०००७७५७.

( तक्रार क्र.सिजीआरएफ/एझेड/औबाद /ग्रामिण/ ५४७ / २०१५ / १० )

आपण दाखल केलेल्या तक्रारीवरील या मंचाचा आदेश सोबत जोडला आहे. हा आदेश मान्य नसल्यास आपण विद्युत लोकपाल यांच्याकडे ६० दिवसाच्या आंत अपिल दाखल करू शकता.

प्रति,सविनय सादर
मुख्य अभियंता परिमंडळ कार्यालय
म.रा.वि.वि.क.मर्या.औरंगाबाद.

सदस्य/सचिव
ग्राहक गा-हाणे निवारण मंच
म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.

प्रति,
कार्यकारी अभियंता (प्रशासन),
अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,
म.रा.वि.वि.कं.म. ग्रामिण मंडळ कार्यालय, औरंगाबाद
माहिती व उचीत कारवाही करीता

विद्युतलोकपालाचा पत्ता,
विद्युत लोकपाल,
प्लॉट नं १२,शिवकृपा, विजयनगर,छावणी,
नागपुर ४४००१३
फोन नं. (०७१२)२०२२१९८ - E-mail – cgrfnz@gmail.in /
sectretaryombudsmannagpur@gmail.com